दै. देशोन्नती दि. २३.०२.२०२२



कॅमेरा लेन्स

**नांदेड :** अर्धापूर तालुक्यातील लहान येथील शिवारातून मोबाईल कंपनीच्या टॉवरच्या बॅटऱ्यांची चोरी केली व गुन्ह्यामध्ये स्कॉर्पिओ गाडीचा वापर करण्यात आला. स्थानिक गुन्हा शाखेने आरोपींचा शोध घेऊन त्यांना जेरबंद करून मुद्देमाल जप्त केला आहे.

# बॅटऱ्या चोरणाऱ्या टोळीला स्थागुशाने केले जेरबंद

## ५ लाख ५७ हजाराचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ एका मोबाईल टॉवरच्या १ लाख ५७ हजार रुपये किंमतीच्या बॅटऱ्या चोरणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हा शाखेने काही तासातच जेरबंद केले असून या चार चोरट्यांकडून चारचाकी वाहनासह ५ लाख ५७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अर्धापूर तालुक्यातील लहान येथील राजेश लोणे यांच्या शेतात असलेल्या एका मोबाईल कंपनीच्या टॉवरमधील १ लाख ५७ हजार रुपये किंमतीच्या २४ बॅटऱ्या २१ फेब्रुवारी रोजी चोरीला गेल्या होत्या. या प्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान यातील चोरटे लहान येथे असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली.त्यावरून पोलीस अधिक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरिक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या पथकाने लहान येथील चोरी संदर्भाने खंडू रामराव बाभुळकर (३२), गणेश रामराव बाभुळकर (२७), संदीप सिध्दोजी वानोळे (२४) सर्व रा.लहान आणि नवनाथ तानाजी मोहकर (३२) रा.चैनापूर या चार जणांना ताब्यात घेतले. चौकशीअंती चोरट्यांनी बॅटऱ्या चोरून चारचाकी गाडी क्रमांक एम.एच.२६ एन.४९४४ मध्ये टाकून त्या बॅटऱ्या नवनाथ मोहकर यांच्या शेतात ठेवल्याचे सांगितले.या कारवाईत पोलिसांनी १ लाख ५७ हजार रुपयांच्या बॅटऱ्या आणि ४ लाख रुपयांची चारचाकी गाडी असा एकूण ५ लाख ५७ हजार रुपयांचा जप्त केला आहे. कारवाई केलेल्या या पथकात सपोनि पांडुरंग भारती, पोउपनि आशिष बोराटे, कर्मचारी गंगाधर कदम, संजीव जिंकलवाड, शंकर केंद्रे, विलास कदम यांचा समावेश होता. यामध्ये ताब्यात घेतलेल्या चोरट्यांना पुढील कारवाईसाठी अर्धापूर पोलिसांच्या स्वाधीन केले.

---

दै. गोदातीर दि. २३.०२.२०२२

# नगीनाघाट येथील खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक

**नांदेड** - नगीनाघाट येथील खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली आहे.

पोलीस ठाणे वजिराबाद हद्दीतील नगीनाघाटयेथे विरसिंघ ऊर्फ विरागुरुदेवसिंघ तिवाना (वय २६ वर्षे) यास जयमल ऊर्फ गग्गा याने खंजरने भोसकले होते. नंतर तो फरार झाला होता. याप्रकरणी पोलीस ठाणे वजीराबादमध्ये गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्यातील फरार असलेल्या आरोपीतांना तात्काळ पकडण्यासाठी पोलीस अधीक्षक यांनी पोलीस निरीक्षक स्थागुशा यांना आदेशीत केले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक स्थागुशा यांनी आपले अधिकारी व अमलदार यांचे पथक तयार करून आरोपींना ताब्यात घेतले.

सोमवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी ...



(वय २१ वर्षे) रा. नांदेड हा निजामबाद येथे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्यांनी स्थागुशाचे अधिकारी व अमलदार यांना नमूद व्यक्तीस पकडुन चौकशी करण्यासाठी रवाना केले. स्थागुशाच्या पथकाने निजामबाद येथे जावुन दिनांक २२ फेब्रुवारी रोजी आरोपीस ताब्यात घेऊन गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्यांनी ...

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पांडुरंग भारती, सपोउपनि जसवंतसिंह शाहु, गोविंद मुंडे, पोहेकॉ ...